RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष २, अंक ५९] सोमवार, जून २७, २०१६/आषाढ ६, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ९७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ जून २०१६.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक अरजा. २०१५/प्र.क्र.२२/सेवा-६.—भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ ला आणखी सुधारणा करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांस, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) (सुधारणा) नियम, २०१६ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा ) नियम, १९८१ (यात यापुढे ज्याचा उल्लेख " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) च्या नियम ६७ पोट-नियम (३) मधील " शासकीय कर्मचाऱ्याने स्वतः होऊन राजीनामा दिला असेल अथवा नोकरी सोडली असेल तर त्याला १५० दिवसांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, त्याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या निम्मी रजा मंजूर करता येईल." हा भाग वगळण्यात यावा.

३. मुख्य नियमांच्या नियम ६८ च्या,—

(i) शीर्षकात " नियत वयोमान सेवानिवृत्तीच्या वेळी कर्मचाऱ्यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या संबंधातील रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम " च्या ऐवजी " नियत वयोमानाने सेवानिवृत्त/सक्तीने सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त/रुग्ण सेवानिवृत्त/स्वतः होऊन राजीनामा अथवा नोकरी सोडणारे कर्मचारी यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या संबंधातील रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम " असा समावेश करण्यात यावा.

(ii) मुख्य नियमांच्या नियम ६८ पोट-नियम (६) नंतर पुढील पोट-नियम समाविष्ट करण्यात यावा व तो दिनांक २५ मे १९८४ पासून लागू असल्याचे समजण्यात यावे :—

"(७) रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी हा, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन ) नियम, १९८२ च्या नियम १० किंवा नियम ६५ अन्वये सेवानिवृत्त होणाऱ्या किंवा सेवानिवृत्त करण्यात आलेल्या, किंवा नियम ६६ अन्वये सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास सेवानिवृत्तीच्या तारखेस त्याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या कालावधी इतकी, मात्र ३०० दिवसांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम या नियमात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने स्वाधिकारे मंजूर करील."

(iii) पोट-नियम (७) नंतर, जो समाविष्ट केला आहे, खालील पोट-नियमाचा समावेश करण्यात यावा व तो दिनांक ३ नोव्हेंबर १९९२ पासून लागू असल्याचे समजण्यात यावे :—

"(८) रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी हा, रुग्ण म्हणून सेवानिवृत्त होणाऱ्या किंवा सेवानिवृत्त करण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास सेवानिवृत्तीच्या तारखेस त्याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या कालावधी इतकी, मात्र ३०० दिवसांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम या नियमात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने स्वाधिकारे मंजूर करील."

(iv) पोट-नियम (८) नंतर (जो समाविष्ट केला आहे) खालील पोट-नियमाचा समावेश करण्यात यावा :—

"(९) रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी हा, स्वतः होऊन राजीनामा देणाऱ्या किंवा नोकरी सोडणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या सेवा समाप्तीच्या तारखेस त्यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या कालावधीइतकी, मात्र ३०० दिवसांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम या नियमात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने स्वाधिकारे मंजूर करील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विदया वाघमारे,**
शासनाच्या उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 24th June 2016.

*NOTIFICATION*

THE CONSTITUTION OF INDIA.

No. ELL. 2015/C.R. 22 /SEVA- 6.– In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend Maharashtra Civil Services (Leave) Rules, 1981 namely :—

1. These rules may be called as the Maharashtra Civil Services (Leave) (Amendment) Rules, 2016.

2. In rule 67 of the Maharashtra Civil Services (Leave) Rules, 1981 (hereinafter referred to as "the Principal Rules"), in sub-rule (3), the portion "If the Government Servant himself resigns or quits service, he may be granted earned leave to the extent of half of such leave to his credit subject to a maximum of 150 days" shall be deleted.

3. In rule 68 of the Principal Rules,—

(*i*) for the heading "Cash equivalent of leave salary in respect of earned leave at the credit at the time of retirement on superannuation" following heading shall be substituted "Cash equivalent of leave salary in respect of earned leave at the credit of a Government Servant at the time of superannuation retirement/compulsory retirement/voluntary retirement/ invalid pension/resigns or quits service."

(*ii*) after sub-rule (6), the following sub-rule shall be added and shall be deemed to have been added with effect from the 25th May 1984, namely :-

"(7) The authority competent to grant leave shall *suo-motu* sanction to a Government Servant who retires or is required to retire under rule 10 or rule 65 or who retires under rule 66 of the Maharashtra Civil Services (Pension) Rules 1982, the cash equivalent of leave salary in respect of the period of earned leave at his credit on the date of his retirement subject to a maximum of 300 days, in the manner specified in this rule.";

(*iii*) after sub-rule (7), as so added, the following sub-rule shall be added and shall be deemed to have been added with effect from 3rd November 1992 namely :—

"(8) The authority competent to grant leave shall *suo-motu* sanction to a Government Servant who retires or is required to retire on invalid pension, the cash equivalent of leave salary in respect of the period of earned leave at his credit on the date of his retirement subject to a maximum of 300 days in the manner specified in this rule.".

(*iv*) after sub-rule (8), as so added, the following sub-rule shall be added, namely :—

"(9) The authority competent to grant leave shall *suo-motu* sanction to a Government Servant when Government Servant himself resigns or quits service, cash equivalent of leave salary in respect of the period of earned leave at his credit on the date of cessation of service subject to a maximum of 300 days, in the manner specified in this rule.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIDYA WAGHMARE,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

क्रमांक अरजा. २०१६/प्र.क्र.२२/सेवा-६
**वित्त विभाग,** मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक २४ जून २०१६.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखापरिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -२, महाराष्ट्र , नागपूर.
महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
उप मुख्य लेखापरिक्षक , स्थानिक निधी लेखा मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे / औरंगाबाद /नागपूर /नाशिक.
निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
राज्यपालांचे सचिव.
मुख्यमंत्र्यांचे सचिव.
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

- प्रबंधक, मूळ न्याय शाखा उच्च न्यायालय, मुंबई.
- प्रबंधक, अपिल शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
- सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
- प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
- प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद.
- मुख्य माहिती आयुक्त, मुंबई.
- आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
- सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
- सचिव महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
- सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.

विशेष आयुक्त, नवीन महाराष्ट्र सदन, कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली.
सर्व मंत्रालयीन विभाग
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागाच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, जिल्हा रत्नागिरी.
कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, जिल्हा रायगड.
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई.

बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई -१.

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी. ओ. बॅरेक नं.-१, योगक्षेम समोर, व. भा. चौक, नरीमन पॉईट, मुंबई -२०.

भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई-४.

भारतीय कम्युनिस्ट पार्टी, (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोबल मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०० ०१३.

इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई.

नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई.

शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई -२८.

निवडनस्ती (सेवा-६)

**पत्राने.**